6

आयुर्वेद महाविद्यालयाला परवानगी देण्याबाबत
जगदंबा एज्युकेशन सोसायटी, येवला संचालित मातोश्री आसराबाई दराडे आयुर्वेद महाविद्यालय, बाभुळगांव, ता. येवला, जि. नाशिक या आयुर्वेद महाविद्यालयाला मान्यता देण्याबाबत..

# महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक: आयमसी-२०१४/प्र.क्र.१७३/१४/शिक्षण-१,
९वा मजला, गो.तें. रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक:- 20 [illegible] 2014

वाचा :- १) शासनाचे समक्रमांकीत दिनांक २६/०६/२०१३ चे ना-हरकत प्रमाणपत्र
२) आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे क्र.R-१४०२१/२१/२०१३-EP(IM-I), दिनांक १७/१०/२०१४ चे पत्र

**प्रस्तावना:-**

जगदंबा एज्युकेशन सोसायटी, येवला संचालित मातोश्री आसराबाई दराडे आयुर्वेद महाविद्यालय, बाभुळगांव, ता. येवला, जि. नाशिक ४२३ ४०१ या आयुर्वेद महाविद्यालयास संदर्भाधीन पत्र क्रमांक १ अन्वये दिनांक २६/०६/२०१३ रोजी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. केंद्र शासनाने संदर्भाधीन पत्र क्रमांक (२) अन्वये ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी संस्थेच्या सदर महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून परवानगी दिलेली आहे. सदर बाब विचारात घेता संस्थेच्या आयुर्वेद महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून आयुर्वेद महाविद्यालय सुरु करण्याकरीता शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासननिर्णय:-**

जगदंबा एज्युकेशन सोसायटी, येवला संचालित मातोश्री आसराबाई दराडे आयुर्वेद महाविद्यालय, बाभुळगांव, ता. येवला, जि. नाशिक ४२३ ४०१ या आयुर्वेद महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून केंद्र शासनाने संदर्भाधीन पत्र क्रमांक (२) अन्वये ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने सदर आयुर्वेद महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून ५० विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी पुढील अटी व शर्थींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

TRUE COPY

Scanned with CamScanner

अटी व शर्ती:-

१. जगदंबा एज्युकेशन सोसायटी, येवला संचालित मातोश्री आसराबाई दराडे आयुर्वेद महाविद्यालय, बाभुळगांव, ता. येवला, जि. नाशिक या आयुर्वेद महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार [illegible] एवढी राहील.

२. राज्य शासन/ केंद्र शासन/ मा. सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दत अवलंबिण्यात यावी.

३. शासकीय नियम/कायदा मा. सर्वोच्च व मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे

४. केंद्र शासन, केंद्रीय भारतीय चिकित्सा परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी आयुर्वेद अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६. सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७. शासकीय आयुर्वेद किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.

९. केंद्र शासनाने दिलेली परवानगी ही सन २०२४-२५ वर्षाकरिता प्रवेशित होणारे विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षामध्ये जाईपर्यंत असून संस्थेने त्यानुसार पुढील वर्षाचे विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाच्या नवीन परवानगी आधारे राज्य शासनाच्या परवानगीचे नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील.

Scanned with CamScanner

१०. संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या यादी प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या फी शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

सदर आदेश केंद्र शासनाचे संदर्भीय क्र.(७) अन्वये केंद्र शासनाच्या दिनांक २७/१०/२०१८ च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(पराग वाकडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
अधिष्ठाता/प्राचार्य, जगदंबा एज्युकेशन सोसायटी, येवला संचालित मातोश्री आसराबाई दराडे आयुर्वेद महाविद्यालय, बाभुळगांव, ता. येवला, जि. नाशिक
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
अधिष्ठाता, सर्व शासकीय आयुर्वेद महाविद्यालये.
अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंटस ऑफ एन एडेड प्रायव्हेट ऑण्ड डेंटल कॉलेजेस, महाराष्ट्र, मॅझनिन फ्लोअर, श्री. जी. हाऊस, ७५, मिंटरोड, फोर्ट, मुंबई.
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती/ शिक्षण शुल्क समिती, ३०५, गव्हर्नमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू) मुंबई-५१.
सर्व उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (शिक्षण-१).

TRUE COPY
Principal
Matoshri Asrabai ... College
Babhulgaon ... Nashik

Scanned with CamScanner